वाचले :

१. ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी,जिजामाता रुग्णालय यांचेकडील पत्र.क्र.जिजा/०१/कावि/४२६/२०२४ दि-०४/०५/२०२४.

२. पत्र क्र.साप्रवि/०९/कावि/५०९/२०२४ दि.०३/०७/२०२४.

३. आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय मुख्य कार्यालय, यांचेकडील पत्र क्र. वैद्य/०१/कावि/४९३/२०२४ दि.०३/०७/२०२४

४. मुख्य लेखापरीक्षक,मु.ले.प यांचेकडील विशेष लेखापरिक्षण अहवाल क्र.मुलेप/१अ/कावि/३३/२०२४ दि-०६/०८/२०२४.

५. कारणे दाखवा नोटीस क्र.जिजा/०३/कावि/४५/२०२४ दि.१०/०८/२०२४

६. ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी,जिजामाता रुग्णालय यांचेकडील पत्र.क्र.जिजा/३/कावि/४७/२०२४ दि-१०/०८/२०२४.

७. मा.आयुक्तसो.यांचा दिनांक. ०६/१२/२०२४ रोजीचा मंजुर प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८,सामान्य प्रशासन विभाग,
क्र.साप्रवि/०९/कावि/९८३/२०२४
दिनांक:- ०६/१२/२०२४

**विषय : विभागीय चौकशी सुरु करण्याबाबत...**
**श्री.गोसावी आकाश प्रदिप,लिपिक**

आदेश,

**ज्याअर्थी, श्री.गोसावी आकाश प्रदिप,** हे वैद्यकिय विभागातर्गत जिजामाता रुग्णालयामध्ये **लिपिक** या गट-क दर्जाच्या पदावर कार्यरत आहेत. कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने त्यांच्याकडे रूग्णालयाकडील दैनंदिन भरणा करणे व भरण्याच्या अनुषंगाने पोटकिर्द रजिस्टर व इतर रेकॉर्ड अद्यावत ठेवणेबाबतचे महत्वपुर्ण कामकाज सोपविण्यात आलेले आहे. त्यानुसार सोपविणेत आलेले कामकाज सचोटीने व जबाबदारीपुर्वक करणे अपेक्षित असताना श्री. गोसावी यांनी र.रू.१८,६६,३८८/- एवढ्या मनपाच्या रक्कमेचा भरणा विलंबाने करून तात्पुरता अपहार केल्याची बाब वाचले क्र. ४ च्या विशेष लेखा परिक्षण अहवालानुसार निदर्शनास आलेली आहे.

**आणि ज्याअर्थी,**उदघृत प्रकरणी मुख्य लेखापरीक्षक,मु.ले.प यांनी विशेष लेखापरिक्षण करून सादर केलेल्या अहवालामध्ये दि.०१ मार्च २०२४ ते दि.३० एप्रिल २०२४ अखेर र.रू.१८,६६,३८८/- एवढी रक्कम विलंबाने भरून मनपाचे आर्थिक नुकसान केल्याचे आक्षेप नोंदविलेले आहे. प्रकरणी **श्री. गोसावी आकाश प्रदिप, लिपिक** यांनी रुग्णालयाकडील दैनंदिन भरणा मनपा कोषागारात नियमितपणे न भरणे, पोटकिर्द रजिस्टर व इतर रेकॉर्ड अद्यावत ठेवणे आवश्यक असताना त्यांनी सदर प्रकरणी गंभीर निष्काळजीपणा व हलगर्जीपणा करून, गैरव्यवहार केल्याचा ठपका वाचले क्र. ४ अन्वये मुख्य लेखापरीक्षणाच्या अहवालामध्ये नोंदविलेला आहे.

**आणि ज्याअर्थी,** ज्येष्ठ वैद्यकिय अधिकारी,जिजामाता रुग्णालय यांनी वाचले क्र. १ व ६ च्या पत्रान्वये श्री.गोसावी यांनी जन्म मृत्यू नोंदणी विभागातील नियमावली न पाळता अनेक दुरूस्ती प्रकरण व नोंदीच्या दुरूस्ती वरिष्ठांची परवानगी न घेता व नियोजित कार्यप्रणालीचा अवलंब न करता अवैधरित्या करीत असल्याचे, अनेक निवृत्त कर्मचा-यांची प्रकरणे रखडून ठेवलेचे, फाईल / नस्ती गहाळ करणे, दैनंदिन भरणा न करणे, नेमुण दिलेले कामकाज न करणे, प्रकरणी वेळोवेळी सुचना व हलगर्जीपणास्तव वेळोवेळी कारणे दाखवा नोटीस देवून देखील त्यांचे वर्तनात कोणतीही सुधारणा होत नसल्याने त्यांचेविरूध्द कडक कारवाई करणेकामी शाखाप्रमुखांनी शिफारस केलेली आहे.

**आणि ज्याअर्थी, श्री. गोसावी आकाश प्रदिप, लिपिक** हे शासकीय पैशाचे अपहारास किंवा दुर्विनियोगास जबाबदार असून त्यांनी नेमुण दिलेल्या कर्तव्यात नितांत सचोटी न राखता, आर्थिक बाबींशी संबंधीत उदघृत गंभीर स्वरुपाचे गैरवर्तंन केले आहे. एकंदरीत त्यांची सचोटी अत्यंत संशयास्पद असून **त्यांनी** महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३(१)(एक)(दोन)(तीन) व महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम (१) मधील तरतूदीचा भंग केलेला असून त्यांचे उदघृत गैरवर्तनामुळे कार्यालयीन शिस्तीवर गंभीर प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव असल्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

**त्याअर्थी**, मी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका **श्री.गोसावी आकाश प्रदिप, लिपिक** यांचे उदघृत गैरवर्तनामुळे रुग्णालयीन अत्यावश्यक सेवेमध्ये अडथळा निर्माण झाल्याची व भरणा विलंबाने भरून तात्पुरता अपहार केल्याची बाब, किंबहुना वेळोवेळी कारणे दाखवा नोटीसा देवुनही त्यांचे वर्तनात कोणतीही सुधारणा न होता गैरवर्तनात झालेली वाढ, प्रकरणी विभागप्रमुखांनी/शाखाप्रमुखांनी केलेली शिफारस विचारात घेता, **श्री.गोसावी आकाश प्रदिप, लिपिक, यांचेविरुध्द** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (१) चे तरतुदींच्या **अधिन, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे. प्रस्तुत आदेशाची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.**

(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका स्थापना ११/१०/८२ पिंपरी-४११०१८

प्रति,

**श्री. गोसावी आकाश प्रदिप, लिपिक, जिजामाता रुग्णालय.**

प्रत,

१. विभागप्रमुख, वैद्यकीय मुख्य कार्यालय व शाखाप्रमुख, जिजामाता रूग्णालय

२/- प्रस्तुत आदेश संबंधितांस बजाविण्यात येवुन त्यांची स्वाक्षांकित पोहोच तात्काळ सादर करावी. व विभागीय चौकशीकामी १५ दिवसांच्या आत दोषारोपपत्र दाखल करावे. याकामी विलंब झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(क) चे तरतुदीनुसार संबंधिताविरुध्द जबाबदारी निश्चित करणेत येईल.

२. टेबल क्र ४, १२, १४, सामान्य प्रशासन संगणक कक्ष

३. लेखा विभाग

४. मुलेप विभाग